# पर्यटनाचे सामाजिक दृष्टिकोनातून महत्व - एक समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा.चामे हरिचंद्र व्यंकटराव .** समाजशास्त्र विभाग प्रमुख, विवेकानंद (कॉलेज अधिकार प्रदत्त स्वायत्त संस्था) कोल्हापूर

---

प्रस्तावना :- पर्यटन हे काळाची गरज आहे. कारण आज विश्वच माझे घर हे संकल्पना पुढे येत आहे. आपण एखाद्या जातीचा धर्माचा देशाचा याच्या पलीकडे जाऊन आपण एक मानव आहोत माणसाने माणसाशी माणसासारखं जगल पाहिजे ही विचारधारा आज विकसित होत आहे . जगात घडणाऱ्या घडामोडीचा परिणाम आपल्या देशावर होतो आपल्या समाजावर होतो त्यामुळे पर्यटनाच्या माध्यमातून जगाला समजून घेण्याची संधी आपल्याला उपलब्ध होते.जगाला समजून घ्यायचा असेल तर पर्यटन करणे हे आवश्यक आहे. आज दरवळण्याच्या साधनांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. कोणत्याही देशाची समाजाची संस्कृती समजून घेण्यासाठी त्या देशांमध्ये पर्यटन करणे खूप महत्त्वाचे असते. समाज माध्यमाच्या माध्यमातून वेगवेगळ्या देशाच्या संस्कृतीची ओळख जरी आपणाला होत असली तरी प्रत्यक्ष तिथे उपस्थित राहून त्या संस्कृतीला समजून घेणे खूप गरजेचे आहे. पर्यटनामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो आपल्या ज्ञानामध्ये भर पडते. आणि आज अनेक राजकीय नेते इतर देशांमध्ये पर्यटनासाठी जातात तेथील प्रशासन व्यवस्थ. राजकीय परिस्थिती.आर्थिक परिस्थिती,सामाजिक परिस्थिती समजून घेतात आणि आपल्या समाजामध्ये किंवा आपल्या देशामध्ये आल्यानंतर आपल्या समाजामध्ये सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करत असतात. पर्यटनामुळे आपल्या मध्ये असणारी संकुचित भावना आपल्यामध्ये असणारा न्यूनगंड कमी होतो आपले विचार सर्वसामावेशक बनायला लागतात.

आपल्या समाजात असणाऱ्या वाईट प्रथा परंपरा यामध्ये सुधारणा करणे शक्य होते. जगात अशी अनेक पाश्चात्य राष्ट्र आहेत की ज्यांनी आपली प्रगती खूप मोठ्या प्रमाणात केली आहे त्यांच्या प्रगतीची पाहणी केल्यानंतर आपल्या विचारांमध्ये परिवर्तन होतं .विकासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो. आपल्या समाजात असणाऱ्या प्रथा, परंपरा,अनिष्ट रितीरिवाच या किती वाईट आहेत याची प्रचीती येते. पूर्वी दळवळणाच्या सुविधा नव्हत्या प्रवासाची साधने नव्हती रस्ते नव्हते त्यामुळे अनेक लोक गावात जन्म झाला त्याच गावातच त्यांचा मृत्यू झाला जगाशी कधी संपर्क आलाच नाही त्यामुळे त्या लोकांमध्ये परिवर्तनच झालेले नाही. जून ते सोनं ही मानसिकता त्यांच्यामध्ये निर्माण झाली. जोपर्यंत आपण पर्यटन करणार नाही तोपर्यंत इतर समाजातील बदल,परिवर्तन,आधुनिक विचारधारा या गोष्टीपासून आपण अलिप्त राहू. आपण समाज माध्यमाच्या माध्यमातून इतरांची संस्कृतीचा अंधानुकरण करत आहोत जोपर्यंत आपण पर्यटन करणार नाही त्या समाजामध्ये जाऊन त्या संस्कृतीला समजून घेणार नाही त्या संस्कृतीची चांगले वाईट परिणाम आपण प्रत्यक्ष तिथे जाऊन अनुभवणार नाही तोपर्यंत एखाद्या संस्कृतीचा अनुकरण करणे म्हणजे त्याचा वाईट परिणाम आपल्या संस्कृतीवर होण्याची शक्यता असते .आपल्या समाजासाठी ते घातक आहे. म्हणून पर्यटनाच्या माध्यमातून इतरांची संस्कृती समजून घेणे खूप महत्त्वाचे आहे. आज नवीन नवीन शोध लागत आहेत आपण ए आई च्या दुनियेमध्ये जीवन जगत आहोत पण आज अशाही काही जनजाती आहेत ज्या जंगलात वास्तव्य करतात त्यांना या परिवर्तनाचा या नवनवीन शोधांचा काही एक संबंध नाही फक्त पर्यटन प्रगतीसाठीच किंवा विकासासाठीच न करता ज्या प्रगत समाजापासून अनेक वर्ष दूर असणाऱ्या जनजाती आहेत ज्या जंगलामध्ये आजही वास्तव्य करतात ना तिथे लाईट न रस्ता ना मूलभूत सुविधा अशा अवस्थेत जगणारा एक समाज आपल्या या पृथ्वीतलावर राहतो त्या समाजाला समजून घेयायचे असेल तर पर्यटन हे खूप महत्त्वाचा आहे..

उद्दिष्टे:-

1) पर्यटनाचे महत्त्व समजून घेणे.

2) पर्यटनामुळे समाजात होणाऱ्या सामाजिक बदलांचा अभ्यास करणे.

3) पर्यटनाचा परिणाम अभ्यासाने.

गृहीतके :-

1)प्रयत्नामुळे विकासाला चालना मिळते.

2) पर्यटनातून सांस्कृतिक देवाण-घेवाण होते.

3) पर्यटनामुळे सामाजिक परिवर्तन घडून येते.

संशोधन पद्धती :--

प्रस्तुत संशोधनासाठी द्वितीय तथ्य संकलनाचा वापर करण्यात आला आहे यात विशेषतः संदर्भ ग्रंथ इंटरनेट मासिके इत्यादीचा वापर करण्यात आला आहे.

पर्यटनाचे सामाजिक दृष्टिकोनातून महत्त्व :-

व्यापक दृष्टिकोन निर्माण होतो :-

पर्यटनामुळे इतरांच्या संस्कृतीचा संपर्क येतो इतरांची संस्कृती जाणून घेण्याची संधी मिळते त्यामुळे व्यक्तिमध्ये असणारा न्यूनगंड ,अहंकार कमी होण्यास मदत होते. व्यक्तीच्या वैचारिक क्षमतेचा विकास होण्यासाठी पर्यटन खूप महत्त्वाचा आहे. त्यातून विचाराच्या कक्षा रुंदावतात.

सांस्कृतिक देवाण-घेवाण (Cultural Exchange):- आजच्या आधुनिक युगामध्ये जगाची संस्कृती एकच झाली आहे या भूतलावर अनेक सांस्कृतिक वारसा असलेल्या जनजाती जमाती आहेत. जोपर्यंत आपण पर्यटन करणार नाही इतर देशांमध्ये जाऊन त्यांची संस्कृती पाहणार नाही. आत्मसात करणार नाही.तो पर्यंत त्या संस्कृतीची ओळख आपल्याला होणार नाही. त्या संस्कृतीमध्ये असणाऱ्या चांगल्या वाईट गोष्टीचा अभ्यास जर करायचा असेल तर प्रत्यक्ष त्या संस्कृतीला जवळून पाहणे खूप गरजेचे असते. पर्यटनामुळे आज कोणतीही संस्कृती स्वतंत्र राहिलेले नाही इतर देशातील समाजातील संस्कृतीच्या छटा या प्रत्येक संस्कृतीमध्ये दिसून येतात. याचं महत्त्वाचं कारण म्हणजे पर्यटन पर्यटन केल्याने इतरांची संस्कृती समजून घेणे इतरांच्या संस्कृतीतील चांगल्या वाईट बाबी आत्मसात करणे आणि आपल्या संस्कृतीमध्ये गरजेनुसार बदल करणे या सर्व गोष्टीसाठी पर्यटन खूप महत्त्वाचे. भारतीय समाजात आणि एक प्रथा परंपरा होत ब्रिटिश जर भारतात आले नसते तर आज ही सती प्रथा बालविवाह प्रथा यासारख्या अनिष्ट प्रथा अस्तित्वात राहिल्या त्या पण ब्रिटिशाची संस्कृती आपल्यापेक्षा वेगळी होती आणि आपल्या संस्कृती मध्ये अमानवी प्रथा होत्या त्यात परिवर्तन करण्यासाठी ब्रिटिशांची विचार त्यांची संस्कृती ही आपल्याला सहाय्यक ठरली.

सामाजिक एकात्मता आणि ऐक्य (Social Integration).

आपण आपल्या समाजा व्यतिरिक्त इतर कुठेही पर्यटन जर नाही केलं तर आपल्याला आपल्या समाजाविषयी स्वाभिमान तर वाटतोच पण त्याचप्रमाणे इतर समाजाविषयी आपल्या मनामध्ये सहानुभूतीचे किंवा आपुलकीचे विचार राहत नाहीत. विश्वच माझे घर हे हे विचार आपल्या मनामध्ये निर्माण होणार नाही पर्यटनामुळे इतरांची संस्कृतीची ओळख होते इतर देशातील लोकांशी संपर्क येतो त्यामुळे आपलेपणा आपुलकी किंवा एकात्मता निर्माण होण्यास पर्यटनाची भूमिका खूप महत्त्वाची आहे.

स्थानिक संस्कृती आणि वारसा जतन (Preservation of Culture & Heritage)

आपण जर पर्यंत केलं तर जगात होणारे परिवर्तन जगात होणारे बदल इतरांच्या संस्कृतीकडून आपल्याकडे येणारे नवीन विचार याची कल्पना आपणास होईल त्यामुळे आपल्या संस्कृतीमध्ये आपल्या स्थानिक संस्कृतीमध्ये जे चांगल्या गोष्टी आहेत. जी नैतिक मूल्य आहेत त्यात बदल होऊ नये यासाठी आपल्याला नियोजन करणे किंवा आपली संस्कृती टिकून ठेवणे यासाठी कोणते उपाय योजना करता येईल याची कल्पना आपल्याला पर्यटनामुळे येते येणाऱ्या काळामध्ये आपल्या संस्कृतीवर कशा पद्धतीने आघात होऊ शकतो याची जाणीव होण्यासाठी पर्यटन खूप महत्त्वाचा आहे. परिवर्तनाच्या या युगामध्ये आपल्या संस्कृतीचे अस्तित्व टिकून ठेवण्यासाठी होणाऱ्या बदलाची जाणीव आपल्याला असणे खूप गरजेचे आहे.

सामाजिक जागरूकता आणि शिक्षण (Awareness & Education)

आज आपली शिक्षण संस्कृती चांगली आहे किंवा माझ्या देशामध्ये मी शिक्षण घेणार हा विचार कुठेतरी मागे पडू लागला. आज जिथे जिथे चांगले शिक्षण मिळेल नवीन नवीन गोष्टी मिळतात अशा ठिकाणी लोक जायला लागले त्याच्यामुळे नवीन नवनवीन शोध नवीन नवीन तंत्रज्ञान यासारख्या नाविन्यपूर्ण गोष्टीची जाणीव भारतीयांना होत आहे. येणाऱ्या काळामध्ये कोणते आव्हाने आपल्यासमोर उभे राहतील याची जाणीव या पर्यटनामुळे होत आहे. इतर देशात पर्यटन केल्यामुळे तिथं काळाच्या ओघात मध्ये निर्माण झालेल्या वेगवेगळ्या अडचणी कशा निर्माण झाल्या. त्यासाठी कोणती कारण कारणीभूत आहेत. ही जागरूकता निर्माण होण्यासाठी पर्यटन खूप महत्त्वाचे आहे..

रोजगारनिर्मिती आणि सामाजिक विकास :या(Employment & Social Development)

अनेक राजकीय लोक मंत्री वेगवेगळ्या ठिकाणी पर्यटन करतात त्यामागचा उद्देश हाच असतो की तिथं वेगवेगळ्या उद्योगाची पाहणी करण्याची संधी मिळते ते उद्योग आपल्या देशामध्ये सुरू करता येतील का? आपल्या देशामध्ये रोजगार निर्माण होईल का आपल्या देशातील विकासाला हातभार लागेल का? या गोष्टी पाहण्यासाठी अनेक वेळा मंत्री मंडळातील अनेक सदस्य विदेशात जाऊन तिथे विकास कशा पद्धतीने होत आहे. त्या पद्धतीने आपल्या देशामध्ये विकास करता येईल का? विकासाचे नव- नवीन तंत्रज्ञान आपल्या देशामध्ये आणण्याचा प्रयत्न करतात. त्यातून रोजगार निर्मिती तर होतेच तसेच समाजाच्या विकासाला चालना पण मिळते.

महिलांचे सक्षमीकरण (Women Empowerment)

आजही आपल्या देशामध्ये स्त्रियांना दुय्यम दर्जा आहे जरी सुशिक्षित महिला शहरात राहणाऱ्या महिला या जर बाजूला काढल्या तर ग्रामीण भागामध्ये आजही स्त्रियांना दुय्यम दर्जा दिला जातो. महिला विषय विचारांमध्ये परिवर्तन होण्यासाठी जगातील इतर देशातील महिलांच्या अभ्यास करणे खूप गरजेचे आहे पर्यटनामुळे इतर देशांमध्ये महिलांना कशा पद्धतीचे स्वातंत्र्य आहे .कशा पद्धतीने महिला जीवन जगतात स्त्री पुरुष भेदभाव केला जातो का ?आपल्या संस्कृतीमध्ये हे प्रथा परंपरा कशा पद्धतीच्या वाईट आहेत याची कल्पना येण्यासाठी पर्यटन खूप महत्त्वाचे आहे. इतर देशातून एकटी महिला भारतात पर्यटन करण्यासाठी येते. त्यावरून लक्षात येते की त्या देशामध्ये महिलांना स्वातंत्र्य किती आहे. जगात पर्यटन केलं तर आपल्या लक्षात येईल की जे विकसित देश आहेत त्या देशातील महिलांची स्थिती काय आहे महिला जर सक्षम झाल्या तर देशाच्या विकासाला हातभार लागतो. देशाच्या विकासाला गती मिळते याची जाणीव पर्यटनामुळे होऊ शकते.

सामाजिक परिवर्तन:- परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे प्रत्येक समाजामध्ये कमी जास्त प्रमाणात परिवर्तने हे होतच असतं आज जर बघितलं तर आदिवासींमध्ये पण खूप मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आदिवासी चा प्रगत लोकांशी आलेला संपर्क जोपर्यंत आपण आपल्यापेक्षा विकसित लोकांच्या संपर्कात येत नाही तोपर्यंत आपण काय आहोत आपला विकास किती झाला आहे याचा तुलनात्मक अभ्यास करण्याची संधी आपल्याला मिळत त्यासाठी पर्यटन केल्यानंतर इतर देशातील रस्ते तिथे झालेला विकास याची कल्पना येते त्यातून त्या देशाच्या विकासाचे मॉडेल आपण स्वीकारतो. पाचशे ते राष्ट्राच्या संपर्कात आपल्या देशातील लोक आले नसते तर आज भारतामध्ये जे मानवी प्रथा परंपरा होते अस्पृश्यता, सथी प्रथा ,विधवा पुनर्विवाह बंदी यासारख्या अनिष्ट प्रथा परंपरेमध्येच आपण गुंतून राहिला असतो पण दरवळणाच्या साधना मुळे किंवा पर्यटनामुळे आपल्या विचारांमध्ये परिवर्तन होतं त्यातून समाजात परिवर्तन घडवून येते.

सांस्कृतिक परिवर्तन :- जगाच्या संपर्कामुळे आपली संस्कृती जशीच्या तशी राहिलेली नाही काळानुसार त्यामध्ये परिवर्तन होत आहे जुन्या गोष्टी मागे पडत आहेत जगामध्ये नवीन नवीन ज्या गोष्टी येत आहेत त्या आपल्या संस्कृतीमध्ये आत्मसात केल्या जातात आणि आपली संस्कृती ही बदलत असते. इतरांच्या संस्कृतीतील चांगल्या गोष्टी आपण आत्मसात करतो व आपल्या संस्कृतीमध्ये परिवर्तन घडून आणतो. आजच्या आधुनिक युगामध्ये जगासोबत चालणे खूप गरजेचे आहे त्यामुळे माझी संस्कृती श्रेष्ठ आहे मी त्यात परिवर्तन करणार नाही याला आज महत्व राहिलेले नाही तर काळानुसार परिस्थितीनुसार आपल्या संस्कृतीमध्ये नवीन नवीन गोष्टी स्वीकारणे खूप गरजेचे असते आणि हे करण्यासाठी पर्यटन खूप महत्त्वाचा आहे कारण प्रत्यक्ष एखाद्याची संस्कृती तिथे जाऊन समजून घेतल्यानंतर आपल्या संस्कृतीमध्ये योग्य तो बदल करणे सहजरित्या शक्य होते.

निष्कर्ष:- बदलत्या जगामध्ये पर्यटन खूप महत्त्वाचे आहे हे तंत्रज्ञानाचे युग आहे यात रोज परिवर्तन होत आहे या परिवर्तनाची जाणीव करून घ्यायची असेल तर पर्यटन खूप महत्त्वाचा आहे.पर्यटनामुळे आपल्यामध्ये असणारा अहंपणा कमी होतो व इतर देशातील ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्या आत्मसात करण्याची संधी मिळेल त्यातून आपल्या देशाच्या विकासाला हातभार लावतो .परिवर्तन हे काळाची गरज आहे पण हे परिवर्तन का? कसे झाले? याची जाणीव करून घ्यायची असेल तर पर्यटन हा एक महत्त्वाचा पर्याय आहे आपण आपल्याच विश्वामध्ये गुंतून राहण्यापेक्षा जगात काय चाललेला आहे हे पाहणे पण गरजेचे आहे.

संदर्भ (References) :-


- Bhatia, A. K. (2013). Tourism Development: Principles and Practices. New Delhi: Sterling Publishers.
- Singh, L. K. (2008). Fundamentals of Tourism and Travel. New Delhi: Isha Books.
- Mathieson, A. & Wall, G. (1982). Tourism: Economic, Physical and Social Impacts. London: Longman.
- Sharma, K. L. (2012). Indian Social Structure and Change. New Delhi: Rawat Publications.
- Government of India (Ministry of Tourism). India Tourism Statistics Report.
- UNWTO (World Tourism Organization) Reports.